# प्रभू राजगडकर
# यांच्या तीन कविता

**खबरदार**

खबरदार
रस्त्यावरून चाललात खबरदार
झाडाला हात लावाल खबरदार
रेती माती दगड उचलाल खबरदार
कायदाबियदा काही आहे की नाही
खबरदार!

कशाचा वनहक्क आणि कशाचा पेसा
आले कॉर्पोरेट धोरण कुठूनही घुसा
तुम्ही जल, जंगल, जमीन देत बसा नारा
कायदाबियदा काही आहे की नाही
खबरदार!

जंगलात आजकाल माणसापेक्षा जवानच जास्त
मदत केंद्र रानारानात सजली कशी मस्त
बंदुकीचा धाक इकडूनही-तिकडूनही
अन आम्हालाच म्हणतात कसे
कायदाबियदा काही आहे की नाही
खबरदार!

लंगोटी लावून चुपचाप बसलेत भयग्रस्त
चेहऱ्यावरती भाव आताही तणावग्रस्त
आजवर जगतच आलो अभावग्रस्त
मदतकेंद्रापुढं बायामाणसं चिंताग्रस्त
अन आम्हालाच म्हणतात कसे
कायदाबियदा काही आहे की नाही
खबरदार!

बोलण्याची भीती - मूक झाली वाणी
कशी गावी लोकशाहीची गाणी
लोकशाहीच्या घरामंदी बंदुकीचा पहारा
हे पाहून डोस्क फिरे गरागरा
अन आम्हालाच म्हणतात कसे
कायदाबियदा काही आहे की नाही
खबरदार!

जल, जंगल, जमीन यासाठीचा आमचा लढा
कसा लढायचा आमच आमच्यावर सोडा
एके ४७ तुमच्या, तुमच्या जवळ ठेवा
आदिवासीसाठी थोडा स्पेस ठेवा
कायदाबियदा असेलच तर
खबरदार वगैरे दूर ठेवा
नाही तर
आम्हालाच म्हणावे लागेल
खबरदार!
खबरदार !!

## जिग्नेसभाई

तमे क्या छे जिग्नेसभाई
कहा हो जिग्नेस
उना से गांधीनगर
सौराष्ट्र से सुरत
द्वारका से बारडोली
हमने तुम्हे ढुंढा
तमे मळ्या नही.
साबरमती किनारे चक्कर लगा आया
गुजरात की भूमीपर
कही नजर न आए.

विकासपुरुष के
गुजरात मे यह कैसा
चमत्कार.

गैय्या मैय्या से पुछा
डरी सी सहमी सहमी थी
उन के रक्षको से भी पुछा.

गैय्या मैय्या कछू ना बोली
बोले रक्षक भैय्या
विकासपुरुस की जय हो!

जिग्नेसभाई,
अगर हो खैरीयत
तो खबर कर देना
आवाज देना-
भीमराव आंबेडकर के नाम से
हमे है लडाई जारी रखना.

## महादेव इरपातेच शीरीनिवासला पत्र :

टीवीवर आल जी - पेपरराल्यानही छापल जी
माहावाल सरवीकडे नाव झाल जी
पर म्या नाही मारला वाघ
खोट कायले बोलू; म्या खरच नाही मारला वाघ.
कर्जबिर्ज काढूनशन पेरल जीवापुरत वावरात
तरास द्याले लागले डुकर
त शान्या माणसायीन देल्ला जी मले सल्ला
महादेव भाऊ देन गा कुपाले करंट - डुकर परतेत दूर
पयल त मले भेवच लागल, पर का करते
पिकपानी हाती नाही आल त का खाऊनशान!
पोराबारायीच शिक्शन त्यायीलेही पायजेल पैसाआडका
मयाकडे का नोटाचा छापखाना, का कारा पैसा!
मनावर दगड ठेवूनशान सोरला करंट कुपात
सकारी सकारी गेलो गा वावरात, बंद कराले करंट
त हा पट्टेवाला शीरीनिवास आडवा पडला होता
त्याले आडवा पाहून माहे त होशच गेले
नातेवाईकाले बोलावल, इचारल का कराच बापू
थो मनाला गाडून टाकू - ह्या बेल्टाले फेकून देऊ
मले काई बेल्टाच समजल नाई
इकडे आड तिकडे इहिर
अशी झाल्ती मयी गत

शीरीनिवासले मायवालच सापडल का वावर फिरत फिरत याले
कायले आल्ता असल शीरीनिवास मया आदिवासीच्या वावरात
त्याईच्या पूर्वजाले तर ठाव होत आदिवासी मुळच वाघ जीते राह्यले.

बाबा शीरीनिवासा तुले मारण्याचा मायवाला नोहोता गा इरादा
मी नाही मारल गा तुले, ना तुले माराले आलो
ना तुले बुलावा देल्ला, ये जो करतो तुहीवाली शिकार
कायले आल्ता गा माह्याच वावरा.
आयुक्शभराचा बसला ठपका
जेहलात जाऊन आल्याचा, तुले मारल्याचा
मी सादासुदा बालबच्चेवाला
पिकपानी झाल त जगणारा
नाही झाल तरी जगणारा
तुह्या पूर्वजालेही ठावूक अन तुलेबी
माह्या पूर्वजाले अन मलेबी
आपण एकमेकाले जगवून जगत होतो जंगलातच!
शीरीनिवासा अनवधानाने झाल्या चुकीबद्दल माफ कर वाघा!
तुहाच : महादेव इरपाते मु. पो. कोथुळना, तह. नागभिड, जि. चंद्रपूर

**प्रभू**
**राजगडकर**
नागपूर
prabhu.rajgadkar@gmail.com